ಒಟ್ಟು ಪ್ರಶ್ನೆಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 26 ]
Total No. of Questions : 26 ]

[ ಒಟ್ಟು ಮುದ್ರಿತ ಪುಟಗಳ ಸಂಖ್ಯೆ : 4
[ Total No. of Printed Pages : 4

**ಸಂಕೇತ ಸಂಖ್ಯೆ : 450-M (RS)**
**Code No. : 450-M (RS)**

# ಡಿ.ಎಲ್.ಎಡ್. ದ್ವಿತೀಯ ವರ್ಷ
# D.El.Ed. SECOND YEAR
# ಕಲಿಕೆಯನ್ನು ಅನುಕೂಲಿಸುವುದು (ಹಿ.ಪ್ರಾ.ಶಾ.)
# ಪ್ರಥಮ ಭಾಷೆ – ಮರಾಠಿ
# FACILITATING LEARNING ( HPS )
# FIRST LANGUAGE – MARATHI

(ಪರಿಷ್ಕೃತ ಪಠ್ಯವಸ್ತು)
**(Revised Syllabus)**

ದಿನಾಂಕ : 10. 12. 2018 ]
Date : 10. 12. 2018 ]

ಸಮಯ : ಮಧ್ಯಾಹ್ನ 2.00 ರಿಂದ 5.00 ರವರೆಗೆ ]
Time : 2.00 P.M. to 5.00 P.M. ]

[ ಗರಿಷ್ಠ ಅಂಕಗಳು : 60
[ Max. Marks : 60

*ಅಭ್ಯರ್ಥಿಯ ನೋಂದಣಿ ಸಂಖ್ಯೆ*
*Register Number of the Candidate*

***सामान्य सूचना :*** i) प्रत्येक उत्तराचे चिंतन, संघटन करून लिहीण्यास अनकुल व्हावे म्हणुन या पेपरला 3 तास वेळ दिलेला आहे.

ii) प्रत्येक प्रश्नाचे उत्तर दिलेल्या सुचनां प्रमाणे लिहीणे आवश्यक आहे.

**भाग - I**

I. खालील प्रश्नाना **चार** बहुपर्यायी उत्तरे दिलेली आहेत. त्यातील योग्य ते उत्तर निवडुन लिहा. प्रत्येक प्रश्नाला एक गुण आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे : $10 \times 1 = 10$

1. भाषा आणि चिंतन हे एक दुसऱ्याशी असे आहे.
   (अ) पुरक नाही (आ) पुरक आहे
   (इ) समान आहे (ई) समान नाही.

2. प्रथमतः शाळेत येणारे मुल किमान इतक्या शब्दांचा वापर करते.
   (अ) 8000 शब्दांचा (आ) 14000 शब्दांचा
   (इ) 2500 शब्दांचा (ई) 2000 शब्दांचा.

3. मुलाला त्याचे विचार मांडण्यास एक उत्तम व्यासपिठ निर्माण करून देण्याची यांची भूमिका महत्वाची आहे.

(अ) मित्राची भूमिका (आ) पालकांची भूमिका

(इ) सरकारची भूमिका (ई) शिक्षकाची भूमिका.

4. यांच्या उपलब्धतेमुळे अनकुल प्रमाणात विविध भाषा आमच्या घरीच उपलब्ध होत आहेत.

(अ) छापिल आणि समुह माध्यमे (आ) दळणवळनाची साधने

(इ) टपाल सेवा (ई) समाजसेवा संघ.

5. मुलाच्या घरच्या भाषेबाबत तुमचे शिक्षकांचे विचार असे असावेत.

(अ) तिरस्कार करणारे (आ) अपमान करणारे

(इ) स्विकार करणारे (ई) गौरव करणारे.

6. प्रारंभि मुलाला अध्ययन माध्यम म्हणुन त्याची मातृभाषा नसल्यास हे होते

(अ) अध्ययन सुलभ होते (आ) भाषेचा विकास होतो

(इ) मुलाचा उत्साह कमी होतो (ई) मुलाचा उत्साह बाढतो.

7. उत्तम श्रवणाची ही तंत्रे आहेत

I. विद्यार्थ्यांना त्यानी ऐकलेल्याची नोंद करण्याची संधी देणे

II. चित्र पाहुन प्रतिक्रिया व्यक्त करणे

III. इत्तरांच्या संभाषणाचे अनुकरण करणे

IV. प्रश्न विचारणे आणि प्रश्न विचारण्याची संधी देणे.

(अ) I आणि II बरोबर

(आ) II आणि III बरोबर

(इ) I आणि IV बरोबर

(ई) III आणि IV बरोबर.

8. वाचकांचा क्लब म्हणजे हे होय.

(अ) वाचक आपन वाचन केलेले चर्चा करण्यास पाच दिवसातून एकदा सभा घेतात.

(आ) वाचक आपन वाचन केलेले चर्चा करण्यास नियमित, मासिक किंवा आठवड्यातून सभा घेतात.

(इ) वाचक आपन वाचन केलेले चर्चा करण्यास आठवड्यातुन एकदा सभा घेतात.

(ई) वाचक आपन वाचन केलेले चर्चा करण्यास मासिक सभा घेतात.

9. वाचनाची अनकुलता निर्माण करण्याच्या तंत्रातोल अक्षर-शब्द अध्ययन कृत्या करताना या गोष्टी लक्षात ठेवाव्यात
   (अ) वाचनकार्ड वापरावर अधिक भर द्यावा
   (आ) पाठ्यपुस्तकाच्या वापरावर अधिक भर द्यावा
   (इ) तक्त्यांच्या वापरावर अधिक भर द्यावा
   (ई) खडुफलक वापरावर अधिक भर द्यावा.
10. वाचनाचे मूल्यमापन करताना या कृती द्याव्यात
   (अ) एखाद्या विषय देऊन त्यावर संभाषण करण्यास लावणे.
   (आ) एखाद्यी गोष्ट सांगुन ती गोष्ट पुन्हा सांगण्यास लावणे.
   (इ) एखाद्या घटनेवर आधारीत निबंध लेखन करण्यास सांगणे.
   (ई) वाचन उद्देशाला अनुसरून प्रश्न तयार करून ते विचारणे तसेच प्रकट वाचन करण्यास लावणे.

## भाग - II

II. खालीलपैकी कोणत्याही **पाच** प्रश्नांची उत्तरे लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान अर्धे पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **दोन** गुण ) : $5 \times 2 = 10$

11. भाषा शिक्षकात आवश्यक गुणलक्षणे सांगा.
12. मुलाला वर्गातोल अनुभव हे कोणती सामर्थ्ये आत्मसात करण्यास सहायक ठरतात ?
13. रचनावादी सिद्धांता आधारीत ( 5E ) च्या पायऱ्या सांगुन 'विस्तार' या पायरीचे विवरण करा.
14. मुलाना कथा सांगण्यापुर्वी कोणती तयारी करावी ?
15. गटचर्चेचे नियोजन करताना गटचर्चे अगोदर मुलाना कोणत्या सुचना द्याव्यात ?
16. तुम्ही एक शिक्षक या नात्याने भाषन स्पर्धेचे नियोजन कसे कराल ?
17. सर्वसमावेशक वर्गात श्रवणदोष असलेल्या मुलांसाठी कोणती अनकुलता निर्माण करून द्यावी / कोणती मदत करावी ?
18. वाचन आणि लेखन यातोल संबंध स्पष्ट करा.

## भाग - III

III. खालील प्रत्येक प्रश्नात निवड दिलेली आहे. त्यातोल एका प्रश्नाचे उत्तर लिहीणे आवश्यक आहे. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर किमान एक पृष्ठ असावे. ( प्रत्येक प्रश्नाला **पाच** गुण ) : $8 \times 5 = 40$

19. अ) भाषा अध्ययनामुळ इत्तर विषयांच्या अध्ययनात मदत होते. स्पष्ट करा.

**किंवा**

   आ) भाषा अध्ययनात शिक्षकाची आणि विद्यार्थ्याची भूमिका स्पष्ट करा.

20. अ) मुलाला त्याच्या घरच्या भाषेतुन शाळेच्या भाषेत रूपांतर करण्यास शिक्षकाने कोणते प्रयत्न केले पाहीजेत ?

**किंवा**

   आ) भाषा वगात मुलाना व्याकरण अध्यापन कसे करावे ? स्पष्ट करा.

21. अ) भाषा अध्ययनाचे मूल्यमापन करताना तुम्ही शिक्षक या नात्याने कोणत्या गोष्टी लक्षात ठेवाल ?

**किंवा**

आ) भाषा अध्ययन पद्धतीमधोल विषय आधारीत क्रिया आधारीत पद्धत स्पष्ट करा.

22. अ) खालील काव्य पंक्तिचा सारांश तुमच्या शब्दात सविस्तर लिहा.

**वाच पुस्तके**

जगण्याचे जर भान पाहिजे, वाच पुस्तके ।
जगती जर सन्मान पाहिजे, वाच पुस्तके ।
ग्रंथावाचन् अर्थहोन हे अवघे जीवन ।
जींदगीत जर जान पाहीजे, वाच पुस्तके ।
संस्कारांनी घडतो माणूस, मोठा होतो ।
मानाचे जर पान पाहिजे, वाच पुस्तके ।
सहा रिपूंच्या हल्ल्यापासुन वाचवणारा
हृदयो जर भगवान पाहीजे, वाच पुस्तके ।
आयुष्याच्या रूक्ष कोरड्या वाटेवरती
हिरवे जर तुज रान पाहीजे, वाच पुस्तके ।
स्वत्व, संस्कृती, मायमराठी हवी जपाया
मातीचा अभिमान पाहिजे, वाच पुस्तके ।

**किंवा**

आ) तुमच्या शाळेच्या बाजुला असलेल्या गटारीमध्ये पानी साचुन दर्गंधी निर्माण झाली आहे. तेव्हा तेथील संबंधीत ग्रामपंचायत, नगरपालीकेला गटार स्वच्छ करण्याबाबत विनंती अर्ज करा.

23. अ) श्रवण कृतींचे संघटन करावयाच्या पद्धती समजुन घ्यावयाचे तीन टप्पे स्पष्ट करा.

**किंवा**

आ) श्रवण ग्रहणाचे मूल्यमापन आणि प्रत्याभरन कसे करावे ?

24. अ) बहुभाषा वर्गात मुलांचा भाषिक विकास होतो. समर्थन करा.

**किंवा**

आ) श्रवणाच्या विविध तंत्रामधोल प्रश्न विचारणे आणि प्रश्न विचारण्याची संधी देण्याचे तंत्र स्पष्ट करा.

25. अ) वर्ग ग्रंथालयाची निर्मिती आणि त्याची आवश्यकता या विषयावर चर्चा करा.

**किंवा**

आ) ग्राफिक ऑर्गनायझर म्हणजे काय ? उदाहरणासह स्पष्ट करा.

26. अ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने वाचनाचे मूल्यमापन कसे कराल ?

**किंवा**

आ) तुम्ही एक शिक्षक या नात्याने विद्यार्थ्यांनी एक उत्तम वाचक बनण्यास कोणती अनकुलता निमाण करून द्याल ?